Lokmanya Tilak Jankalyan Shikshan Sanstha's
PRIYADARSHINI BHAGWATI COLLEGE OF ENGINEERING, NAGPUR
Harpur Nagar, Umred Road, Nagpur- 440024
An Autonomous Institution Affiliated to R.T.M. Nagpur University, Nagpur
Accredited with Grade 'A' by NAAC
E-mail: principalpbcoe@gmail.com Website: www.pbcoe.edu.in

Ref no.: PBCOE/Admin/26-27/A  Date:- 27/08/2026

# Notice

## Provisional Admission for RTMNU-CBS/CBCS Scheme students

All students of the **RTMNU Pattern/Batch** who have been unable to take admission to the **Third Year/Fourth Year** due to failure in the **First Year and/or Second Year examinations** are hereby informed to immediately contact the **PBCOE Office** for completing the process of **Provisional Admission** to the College.

This provision is in accordance with **RTMNU Circular No. 334 dated 14/08/2026** and **RTMNU Circular No. 353 dated 20/08/2026**.

All concerned students are advised to complete the necessary admission formalities at the earliest to avoid any inconvenience or delay in their academic progression.

Enclosed: Copy of RTMNU circular No. 353 dated 20/08/2026

Principal
Dr. A. M. Shende

PRINCIPAL
PRIYADARSHINI BHAGWATI COLLEGE OF ENGG
UMRED ROAD NAGPUR

Copy to,
Registrar & CoE, All Deans, All Heads
Display on notice boards and website

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

" (सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम कमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ"

## (विद्या विभाग)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ जमनालाल बजाज प्रशासकिय भवन महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, विद्यापीठ कॅम्पस चौक ते अंबाझरी टी–पॉइंट मार्ग, नागपूर – ४४० ०३३.


क्रमांक : रातुमनावि/विद्या/३५३ दिनांक : २० ऑगस्ट, २०२६

## अधिसूचना

सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(७) अंतर्गत मा. कुलगुरू महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने खालील प्रमाणे निर्णय घेतले आहेत.

विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवविज्ञान आणि आंतर–विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेंतर्गत असलेल्या विविध शाखा/विषयांमधील Choice Based System (CBS)/ Choice Based Credit System (CBCS) प्रणालीतील संबंधित अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्यासाठी **शेवटची संधी खालील प्रमाणे देण्यात येत आहे. संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सदर शेवटच्या संधीचा कुठलाही संबंध कॅरिऑनशी राहणार नाही.**

१. पहिल्या वर्षात अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना, ज्यांना तिसऱ्या वर्षात प्रवेश घेता येऊ शकत नाही, अशा विद्यार्थ्यांना तिसऱ्या वर्षात, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश देण्यास व त्यांना फक्त हिवाळी–२०२६ मध्ये होणाऱ्या प्रथम वर्षाच्या परीक्षेत बसण्यासाठी **शेवटची संधी देण्यात येत आहे.**

२. दुसऱ्या वर्षात अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना, ज्यांना चौथ्या वर्षात प्रवेश घेता येऊ शकत नाही, अशा विद्यार्थ्यांना चौथ्या वर्षात, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश देण्यास व त्यांना फक्त हिवाळी–२०२६ मध्ये होणाऱ्या द्वितीय वर्षाच्या परीक्षेत बसण्यासाठी **शेवटची संधी देण्यात येत आहे.**

३. तिसऱ्या वर्षात अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना, ज्यांना पाचव्या वर्षात प्रवेश घेता येऊ शकत नाही, अशा विद्यार्थ्यांना तिसऱ्या वर्षात, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश देण्यास व त्यांना फक्त हिवाळी–२०२६ मध्ये होणाऱ्या तिसऱ्या वर्षाच्या परीक्षेत बसण्यासाठी **शेवटची संधी देण्यात येत आहे.**

४. वरील प्रमाणे संधी दिल्यानंतर, संबंधित विद्यार्थी जर पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षात उत्तीर्ण झाला तरच त्या विद्यार्थ्याचा पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षात महाविद्यालयात देण्यात आलेला प्रवेश कायम होईल, अनुत्तीर्ण झाल्यास त्या विद्यार्थ्याचा तात्पुरता प्रवेश आपोआप रद्द होईल. सदर परीक्षा संबंधित विद्यार्थी ज्या वेळेस उत्तीर्ण होईल त्यावेळेस जी Scheme of Examination (S.O.E.) लागू राहील, ती त्यांना लागू होईल.

५. संबंधित विद्यार्थ्यांना शेवटची संधी देतांना, विद्यार्थी, विद्यार्थ्याचे पालक व प्राचार्याच्या स्वाक्षरीनिशीचे रू.१००/– च्या स्टॅम्प पेपरवर वचनपत्र (Undertaking) घेऊनच संबंधित विद्यार्थ्यांना पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षात, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश देण्यात येईल व त्यांना हिवाळी–२०२६ मध्ये होणाऱ्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या, वर्षाच्या परीक्षेत बसण्यासाठी शेवटची संधी देण्यात येईल. वचनपत्राचा (Undertaking) नमुना (Format) सोबत संलग्न केला आहे.

मा. कुलगुरुंच्या आदेशान्वये,

(डॉ. विजय खंडाळ)
प्रभारी कुलसचिव

<u>प्रतिलीपी माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव :</u>

१. विद्यापीठाशी संचालीत व संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य.
२. विद्यापीठातील विविध प्राधिकरणांचे सर्व सन्माननीय सदस्य.
३. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख.
४. विद्यापीठातील सर्व अधिकारी/शाखा प्रमुख.

(गणेश कुमकुमवार)
उपकुलसचिव (विद्या)
(अति. प्रभार)

# वचनपत्र (UNDERTAKING)

(रु. १००/– च्या स्टॅम्प पेपरवर)

(विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवविज्ञान आणि आंतर–विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेंतर्गत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी)

मी, श्री./श्रीमती/कु. ————————————————————————————,
————————————————————————————————————

या महाविद्यालयाचा विद्यार्थी/विद्यार्थीनी असून, ———————— ह्या वर्षी Choice Based System (CBS)/ Choice Based Credit System (CBCS) प्रणालीतील ——— वर्षात प्रवेश घेतला होता. परंतु मी ———— वर्षाच्या (१) ————————, (२) ——————————, (३) ——————, (४) ——————— या विषयात अनुत्तीर्ण झाल्यामुळे ——— वर्षाला प्रवेश घेऊ शकत नाही.

त्यानुषंगाने, विद्यापीठाद्वारे निर्गमित अधिसूचना क्रमांक ——————————————, दिनांक ————— ला अनुसरून मी विद्यापीठाशी संलग्नित ————————————————— या महाविद्यालयात ————— वर्षात तात्पुरता प्रवेश घेतला आहे. त्यानुसार मला CBS/ CBCS प्रणालीतील अनुत्तीर्ण विषयांमध्ये हिवाळी–२०२६ मध्ये होणाऱ्या ———— वर्षाच्या परीक्षेत बसण्याची ही शेवटची संधी विद्यापीठाद्वारे देण्यात येत आहे, याची मला पूर्णतः जाणीव आहे. तसेच मला देण्यात आलेल्या सदर शेवटच्या संधीचा कुठलाही संबंध कॅरिऑनशी राहणार नाही, याची सुध्दा मला पूर्णतः जाणीव आहे. मला दिलेल्या शेवटच्या संधीनुसार मी हिवाळी–२०२६ च्या परीक्षेत उत्तीर्ण झालो/झाली तरच मी ——————————————————— या महाविद्यालयात घेतलेला माझा ———— वर्षाचा प्रवेश कायम होईल. परंतु, जर मी सदर परीक्षेत अनुत्तीर्ण/अपात्र झाल्यास माझा ————— वर्षात घेतलेला तात्पुरता प्रवेश आपोआप रद्द करण्यात यावा व कुठल्याही प्रकारचा शुल्क परतावा मला देण्यात येऊ नये.

जर मी हिवाळी–२०२६ च्या परीक्षेत अनुत्तीर्ण किंवा अपात्र झालो तर मला देण्यात आलेल्या ———— वर्षाच्या तात्पुरत्या प्रवेशानुसार मी दिलेल्या सर्व टर्म वर्क आणि विद्यापीठाच्या व महाविद्यालय स्तरावर घेण्यात येणाऱ्या किंवा झालेल्या सर्व परीक्षांमध्ये मला अनुत्तीर्ण घोषित करण्यात यावे व त्या सर्व परीक्षांचे निकाल, तसेच माझा घेतलेला तात्पुरता प्रवेश रद्द करण्यात यावा.

हमीपत्रामध्ये दिलेली सर्व माहिती माझ्या माहितीनुसार खरी व अचूक आहे. कोणतीही माहिती चुकीची, अपूर्ण किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी माझी राहील.

स्थळ : ————————
दिनांक : ___/___/२०२६

विद्यार्थ्याची स्वाक्षरी : ——————————————
विद्यार्थ्याचे नाव : ————————————————
Enrolment No. (नामांकन क्रमांक) : ————————
Branch (शाखा) : ————————————————
मोबाईल क्रमांक : ———————————————

पालक/कायदेशीर संरक्षक/शिक्षक यांची स्वाक्षरी ————
पालकाचे नाव : ————————————————
विद्यार्थ्याशी नाते : ———————————————
मोबाईल क्रमांक : ———————————————

## संबंधित महाविद्यालयाचे हमीपत्र

वरील हमीपत्रातील अटी वाचून व समजावून सांगून विद्यार्थ्याचे/पालकांचे स्वाक्षरीयुक्त हमीपत्र स्वीकारण्यात येत आहे.

स्थळ : ————————
दिनांक : ___/___/२०२६

प्राचार्यांची स्वाक्षरी: ————————————
प्राचार्यांचे नाव : ————————————
महाविद्यालयाचे नाव : ————————————
प्राचार्यांचा शिक्का :